श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

**नॅक मानांकन:** ए$^{+}$ ग्रेड (३.४२ गुण); **एनआयआरएफ रँकिंग – २०२५:** ९३ वे (राष्ट्रीय), ३ रे (राज्य)
**विद्यार्थी केंद्रित प्रकल्प: पीएम-उषा, डीबीटी स्टार कॉलेज (एस.सी.) पदवी, डीबीटी बिल्डर (L1)-पदव्युत्तर**
**युजीसी:** सेंटर ऑफ एक्सलंस स्टेटस, **डीएसटी:** एफआयएसटी अनुदान;
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ:** लीड कॉलेज; **करिअर कट्टा:** सेंटर ऑफ एक्सलंस

# अधिकृत नियमावली, कार्यप्रणाली व तात्विक मार्गदर्शक दस्तऐवज

## (Standard Operating Procedure - SOP)

# उद्योग व उद्योजकता विकास कक्ष

## (Start-Up & Entrepreneurship Development Cell)

## "महाविद्यालयीन उद्योजकता विकास योजना"

[ महाविद्यालय विकास समिती (CDC) सभा दिनांक ०५ एप्रिल २०२३ रोजी सर्वानुमते मंजूर ]

" ध्येय: महाविद्यालयाचा तरुण आता नोकरी मागणारा नाही,
तर अनेक हातांना नोकरी देणारा उद्योगपती बनेल.
स्वाभिमानी युवकांच्या पुरुषार्थातून आत्मनिर्भर राष्ट्रनिर्माण होईल! "

**मंजुरी व खंबीर पाठबळ**

**मा. श्री. हर्षवर्धन देशमुख**
अध्यक्ष,
महाविद्यालय विकास समिती (CDC)

**प्रेरणा व मार्गदर्शन**

**मा. डॉ. जी. व्ही. कोरपे**
प्राचार्य,
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय
अमरावती

**सादरकर्ते व समन्वयक**

**डॉ. दिनेश डी. खेडकर**
समन्वयक,
स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्ष

**उद्यमेन हि सिध्यन्ति**

(महाविद्यालयीन संशोधन संस्कृती संवर्धन समिती अंतर्गत विशेष उपक्रम)

**श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित**

## श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

# अधिकृत नियमावली, कार्यप्रणाली व तात्विक मार्गदर्शक दस्तऐवज

## (Standard Operating Procedure - SOP)

# स्टार्ट अप व उद्योजकता विकास कक्ष

**(Start-Up & Entrepreneurship Development Cell)**

**"महाविद्यालयीन उद्योजकता विकास योजना"**

**महाविद्यालय विकास समिती (CDC) सभा दिनांक ०५ एप्रिल २०२३ रोजी सर्वानुमते मंजूर**

**"ध्येय: महाविद्यालयाचा तरुण आता नोकरी मागणारा नाही, तर अनेक हातांना नोकरी देणारा उद्योगपती बनेल. स्वाभिमानी युवकांच्या पुरुषार्थातून आत्मनिर्भर राष्ट्रनिर्माण होईल!"**

**मार्गदर्शक व मंजुरी प्राधिकरण**

| मंजुरी व खंबीर पाठबळ | प्रेरणा व मार्गदर्शन | सादरकर्ते व समन्वयक |
|---|---|---|
| **मा. श्री. हर्षवर्धन देशमुख** | **मा. डॉ. जी. व्ही. कोरपे** | **डॉ. दिनेश डी. खेडकर** |
| अध्यक्ष, | प्राचार्य, | समन्वयक, |
| महाविद्यालय विकास समिती (CDC) | श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय | स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्ष |

## शैक्षणिक सत्र: २०२६ - २०२७

*(महाविद्यालयीन संशोधन संस्कृती संवर्धन समिती अंतर्गत विशेष उपक्रम)*

# शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती
# स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्ष (Start-Up & ED Cell)

### उद्योग व उद्योजकता विकास कक्ष: अधिकृत नियमावली, सविस्तर कार्यप्रणाली आणि तात्विक मार्गदर्शक दस्तऐवज

## १. आदरपूर्वक कृतज्ञता व आभार (Inspirational Acknowledgments)

महाविद्यालय विकास समितीच्या (CDC) दिनांक ५ एप्रिल २०२३ रोजी पार पडलेल्या ऐतिहासिक सभेमध्ये स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्षाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या "उद्योजकता विकास योजना" या प्रस्तावास सर्वानुमते व उत्साहाने मंजुरी देण्यात आली. हा केवळ एक प्रशासकीय ठराव नसून महाविद्यालयाच्या शैक्षणिक इतिहासाला नवी दिशा देणारा एक क्रांतिकारी निर्णय आहे. या दूरगामी आणि विद्यार्थी-केंद्रित निर्णयाबद्दल स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्ष महाविद्यालय विकास समितीचे (CDC) आदरणीय अध्यक्ष **मा. श्री. हर्षवर्धन देशमुख** यांच्या बहुमूल्य मंजुरीबद्दल, मार्गदर्शनाबद्दल आणि अथांग दूरदृष्टीबद्दल अत्यंत आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.
त्याचप्रमाणे, बदलत्या काळाची पावले ओळखून विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देणारे आणि या संपूर्ण प्रस्तावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य **मा. डॉ. जी. व्ही. कोरपे** यांचे कक्ष जाहीर आभार व्यक्त करते.
महाविद्यालय विकास समितीच्या या सकारात्मक पाठबळानंतर, स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्षाने योजनेच्या प्रत्यक्ष जमिनीवरील अंमलबजावणीसाठी अत्यंत सूक्ष्म, शिस्तबद्ध व शास्त्रशुद्ध नियोजन केले असून, हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न सुरू केले आहेत.

## २. पार्श्वभूमी व मुख्य संकल्पना (Background, Core Concept & Philosophy)

### अ) तात्विक अधिष्ठान: शिक्षणाचा मूळ हेतू काय?

"सा विद्या या विमुक्तये" अर्थात शिक्षण ते आहे जे मानवाला सर्व प्रकारच्या बंधनातून आणि परावलंबित्वातून मुक्त करते. परंतु, आधुनिक काळातील 'लौकिक शिक्षणाच्या' केवळ पदव्या देण्याच्या गाजावाजात आपण शिक्षण संस्कृतीचे मूळ असणाऱ्या 'कौशल्य विकासाचा' आणि स्वावलंबनाचा आत्मा कुठेतरी गमावून बसलो आहोत. केवळ नोकरी मागणाऱ्यांची गर्दी निर्माण करणे हे जिवंत शिक्षण संस्थेचे लक्षण असू शकत नाही. खऱ्या अर्थाने शिक्षण तेव्हाच पूर्ण होते, जेव्हा ते विद्यार्थ्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य आणि आत्मसन्मान देते.

### ब) सद्यस्थितीचे वास्तव आणि संकल्पना

आजच्या २१ व्या शतकातील जागतिक आव्हाने अत्यंत गुंतागुंतीची आहेत. एका बाजूला दरवर्षी साधारण एक कोटी तरुण रोजगाराच्या शोधात बाजारात येत आहेत, तर दुसऱ्या बाजूला कौशल्यपूर्ण मनुष्यबळाअभावी लाखो तांत्रिक नोकऱ्या रिक्त

पडून आहेत. ८०% पेक्षा जास्त युवा वर्ग तांत्रिक किंवा व्यावसायिक कौशल्यांभावी थेट नोकरी मिळवण्यास पात्र ठरत नाही, हे भीषण वास्तव उद्योजकांनी मांडले आहे. या पार्श्वभूमीवर, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (NEP 2020) कौशल्य विकासाला आणि उद्योजकतेला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

या योजनेची मुख्य संकल्पना म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात उपजत असणाऱ्या सर्जनशीलतेला, छंदांना आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना केवळ कागदावर न ठेवता, त्यांना प्रत्यक्ष कायदेशीर व्यवसायाचे रूप देणे होय. महाविद्यालयाचा हा कक्ष विद्यार्थ्यांना केवळ सिद्धांताचे धडे देणार नाही, तर त्यांना **प्रत्यक्ष आर्थिक व तांत्रिक साहाय्य** उपलब्ध करून देऊन कॅम्पसमध्येच खऱ्याखुऱ्या "उद्योगांच्या निर्मितीला प्रत्यक्ष चालना" देईल, ज्यामुळे "सक्षम-शिक्षणाचे जग" प्रत्यक्षात अवतरेल.

## ३. विद्यार्थ्यांकडून कक्षाच्या रीतसर अपेक्षा (Expectations from Students)

महाविद्यालय आपल्या स्तरावर संपूर्ण संसाधने पणाला लावत असताना, विद्यार्थ्यांकडून केवळ 'प्रवेश' घेण्याची नव्हे, तर खालील तात्विक व व्यावहारिक मूल्यांचा अंगीकार करण्याची रीतसर अपेक्षा ठेवली जाते:

- **परावलंबित्वाचा त्याग व स्वयंप्ररणेचा स्वीकार:** विद्यार्थ्यांनी "मला नोकरी कोण देणार?" या मानसिकतेतून बाहेर पडून "मी स्वतःचा उद्योग कसा उभा करू शकतो?" या विजिगीषू वृत्तीचा स्वीकार केला पाहिजे.
- **व्यावसायिक उत्तरदायित्व (Accountability):** हा उपक्रम खेळ किंवा केवळ एक शैक्षणिक प्रकल्प नाही. स्थापन होणाऱ्या कंपन्यांचे नियंत्रण स्वतः विद्यार्थ्यांच्याच संचालक मंडळाकडे असणार आहे. त्यामुळे प्रत्येक पैशाचा हिशोब, वेळेचे व्यवस्थापन आणि ग्राहकांचे समाधान राखण्याची परिपक्वता विद्यार्थ्यांनी दाखवणे गरजेचे आहे.
- **कष्टाची तयारी आणि सामाजिक भान:** स्वतःच्या कौशल्याचा वापर करून शिक्षण घेता घेताच अर्थार्जन करण्याची, स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबाला आर्थिक आधार देण्याची जिद्द विद्यार्थ्यांमध्ये असायला हवी.

## ४. वार्षिक कार्यपद्धतीचे वेळापत्रक (Academic Timeline & Rigorous Preparation)

कक्षाचे कामकाज व्यावसायिक कंपन्यांच्या धर्तीवर अत्यंत अचूक आणि कालबद्ध पद्धतीने चालवले जाईल. विद्यार्थ्यांनी या वेळापत्रकानुसार स्वतःला तयार करायचे आहे:

| दिनांक / कालावधी | विद्यार्थ्यांनी करावयाचे नियोजित व पूर्वतयारीचे कार्य |
|---|---|
| **१ जुलै** | नवीन शैक्षणिक सत्राच्या प्रारंभीच व्यवसायात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयात विस्तृत जाहिरात व अधिकृत आवाहन प्रसिद्ध केले जाईल. |
| **१० जुलै** | इच्छुक, नवनिर्मितीची ध्यास असणाऱ्या आणि कुशल विद्यार्थ्यांची अधिकृत नोंदणी (Registration) करून घेतली जाईल. |
| **२० जुलै** | नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या मुलाखती व गटचर्चा घेऊन प्रत्येक स्वतंत्र व्यवसायासाठी त्यांचे स्वतःचे **'कार्यकारी संचालक मंडळ'** गठीत केले जाईल. |
| **१ ऑगस्ट** | विद्यार्थ्यांच्या तांत्रिक, कलात्मक आणि व्यवस्थापकीय कौशल्यांचे वर्गीकरण करून त्यांच्यामध्ये जबाबदाऱ्यांचे अधिकृत वाटप केले जाईल. |
| **🎯 ऑगस्ट महिना (विशेष स्पर्धा कालावधी)** | अनुदान साहाय्य व बीजभांडवल प्राप्त करण्यासाठी 'महाविद्यालयीन बिझनेस पिचिंग स्पर्धा' आयोजित केली जाईल. महाविद्यालयाने राखून ठेवलेला १.० लक्ष रुपयांचा निधी आणि करिअर कट्टाचे अनुदान मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचा बिझनेस प्लॅन, प्रोटोटाईप (कृती आराखडा) आणि महसूल मॉडेल (Revenue Model) तज्ज्ञ समितीसमोर सादर करावे लागेल. या आर्थिक मदतीसाठी विद्यार्थ्यांनी महिनाभर कसून तयारी करणे अनिवार्य आहे. |
| **सप्टेंबर ते मार्च (वर्षभर)** | निधी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष व्यवसायाची उभारणी करणे, ग्राहकांना व्यावसायिक सेवा देणे, कायदेशीर इनव्हॉईस/बिलिंग तयार करणे आणि प्रत्येक तिमाहीचा प्रगती अहवाल सादर करणे. |

## ५. संघटनात्मक रचना आणि प्रशासकीय कार्ये (Organizational Structure)

या योजनेंतर्गत सुरू होणारे स्टार्टअप्स हे केवळ कागदावर नसून कायद्याच्या चौकटीत नोंदणीकृत असणारे व्यावसायिक भागीदार (Partnership Entities) असतील.

- **कॉर्पोरेट पदे आणि नेतृत्व:** पात्र व गुणवान विद्यार्थी स्वतः व्यवसायाचे **चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर (MD), सी.ई.ओ. (CEO), संचालक (Director), आणि टीम लीडर** यांसारखी कॉर्पोरेट पदे सांभाळतील. यामुळे त्यांच्यात व्यवस्थापकीय कौशल्य प्रत्यक्ष अनुभवातून रुजेल.
- **सहभाग आणि शेअर्स (Democratic Shareholding):** महाविद्यालयात प्रवेश घेणारा प्रत्येक विद्यार्थी प्रवेशाच्या वेळी अवघे २५ रुपये सदस्यता शुल्क भरून या व्यवसायांचे शेअर्स खरेदी करेल. यामागचा तात्विक दृष्टिकोन असा आहे की, जेव्हा विद्यार्थी स्वतः भांडवलाचा हिस्सा बनतो, तेव्हा त्या उद्योगाविषयी त्याच्या मनात एक वेगळीच आत्मीयता, अधिकार आणि जागरूकता निर्माण होते.

- **कायदेशीर प्रशासकीय प्रक्रिया:** विद्यार्थी संचालक मंडळाने कायदेशीर सल्लागारांच्या मदतीने कॉर्पोरेट विश्वातील सर्व प्रशासकीय सोपस्कार स्वतः पूर्ण करायचे आहेत:
    1. प्रस्तावित संचालक आणि शेअर होल्डर्ससाठी **Digital Signature Certificate (DSC)** मिळवणे.
    2. भविष्यातील संचालक म्हणून स्वतःचे **Director Identification Number (DIN)** प्राप्त करणे.
    3. व्यवसायाचे अद्वितीय नाव ठरवून त्याचे **Business Name Approval** करून घेणे.
    4. कंपनीच्या उद्दिष्टांचे दस्तऐवज म्हणजेच **MOA** (Memorandum of Association) आणि **AOA** (Articles of Association) स्वतः मसुदा तयार करून ते **ROC** (Registrar of Companies) कडे सादर करणे.
    5. कंपनीच्या नावे स्वतंत्र **PAN, TAN, आणि GST** नंबर काढून अधिकृत व्यावसायिक बँक खाते उघडणे.

## ६. निधी तरतूद आणि आर्थिक सहाय्य (Financial Support & Capital)

"भांडवलाअभावी कोणतीही उत्तम संकल्पना कोमेजून जाऊ नये" हा या कक्षाचा आर्थिक सिद्धांत आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या परंतु बुद्धिमत्तेची श्रीमंती असणाऱ्या विद्यार्थ्यांना सक्षम करणे हेच या निधी रचनेचे उद्दिष्ट आहे.

- **महाविद्यालयीन बीजभांडवल (Seed Funding):** नवीन आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांच्या या स्टार्टअप्सना गती देण्यासाठी प्रारंभिक गुंतवणूक म्हणून महाविद्यालयाने आपल्या अंदाजपत्रकातून **१.० लक्ष रुपयांच्या** निधीची थेट तरतूद केली आहे.
- **करिअर कट्टा मॉडेल स्किल सेंटर अनुदान:** करिअर कट्टा अंतर्गत महाविद्यालयास मिळालेल्या **"मॉडेल स्कील डेव्हलपमेंट सेंटर"** च्या विशेष शासकीय अनुदानाचा वापर थेट विद्यार्थ्यांच्या उद्योग विकासासाठी, पायाभूत सुविधा उभारणीसाठी आणि आर्थिक मदतीसाठी केला जाईल.
- **बहुआयामी भांडवल उभारणी:** विद्यार्थ्यांचे शेअर्स, महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भागधारक म्हणून गुंतवलेले भांडवल, आणि पालकांकडून मिळणारी व्यावसायिक गुंतवणूक याद्वारे या कक्षाचा आर्थिक पाया अत्यंत भक्कम केला जाईल.

## ७. संधींचा शोध आणि विद्यार्थ्यांचे अफाट कार्यक्षेत्र (Opportunity Exploration)

विद्यार्थ्यांनी हे प्रकर्षाने लक्षात ठेवले पाहिजे की, मानवी गरजा आणि बाजारपेठेच्या कक्षा कधीही मर्यादित नसतात. प्रस्तावामध्ये प्राथमिक स्तरावर मांडलेली तीन क्षेत्रे (डिजिटल कंटेंट डेव्हलपमेंट, एशेंशियल सर्व्हिस हब, प्रोफेशनल इव्हेंट ऑर्गनायझेशन) हे केवळ उद्योग जगतात प्रवेश करण्याचे सुरुवातीचे दरवाजे आहेत.

### व्यापक संधींचा तात्विक दृष्टिकोन (Opportunity Exploration):

तुमच्या अवतीभवती असणारी प्रत्येक समस्या ही प्रत्यक्षात एक व्यावसायिक संधी असते. विद्यार्थ्यांनी केवळ ठराविक साच्यात न अडकता नवनवीन क्षेत्रांमधील व्यावसायिक संधींचा शोध घ्यायचा आहे. या विस्तृत प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती, नाविन्यपूर्ण आयडिया शोधण्याचे मार्ग आणि मार्गदर्शक तत्त्वे आपल्या वेबपोर्टलवरील **"Opportunity**

**Exploration"** या विशेष पेजवर सविस्तर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी त्या पेजचा सखोल अभ्यास करून आपली नवी दिशा ठरवावी.

विद्यार्थी प्रामुख्याने आपल्या अंगभूत कौशल्यानुसार खालील अथांग कार्यक्षेत्रात संधी शोधू शकतात:

- **तांत्रिक व कृषी-सेवा क्षेत्र:** वेब/ॲप डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, एआय-आधारित सोल्युशन्स, गॅजेट व वैज्ञानिक लॅब उपकरण दुरुस्ती, सौर ऊर्जा उपकरण फिटिंग, आधुनिक गार्डनिंग व सेंद्रिय शेती पुरवणी सेवा इत्यादी.
- **कला, माध्यम व सृजनशीलता:** व्यावसायिक अभिनय, पटकथा/संवाद लेखन, डॉक्युमेंट्री मेकिंग, मूर्तीकाम, चित्रकला, हस्तकला, व्यावसायिक फोटोग्राफी, आणि डिजिटल माध्यम निर्मिती इत्यादी.
- **व्यवस्थापकीय व वित्तीय नियंत्रण:** कॉर्पोरेट जाहिरात (Advertising), बाजाराचे सर्वेक्षण (Marketing Survey), इतर उद्योगांचे व्यवस्थापन नियंत्रण आणि व्यावसायिक आर्थिक व्यवहारांचे **ऑडिटिंग (Auditing)** करण्याचे सेवा उद्योग.

## ८. संशोधन, नवकल्पना आणि राष्ट्रीय स्पर्धांमधील सहभाग (National Stature)

आपल्या स्टार्टअप्सचा दर्जा केवळ स्थानिक न राहता तो जागतिक स्तराचा असावा, यासाठी विद्यार्थ्यांच्या उद्योगांना संशोधनाची जोड दिली जाईल. हाच सहभाग महाविद्यालयाच्या **NAAC, NIRF, आणि MoE (शिक्षण मंत्रालय)** यांसारख्या राष्ट्रीय मानांकन प्रक्रियेत मैलाचा दगड ठरेल:

- **राष्ट्रीय हॅकाथॉन व पेटंट निर्मिती:** विद्यार्थ्यांनी शिक्षण मंत्रालयाद्वारे आयोजित होणाऱ्या **Smart India Hackathon (SIH)**, नाविन्यपूर्ण कल्पकतेसाठी असणारा **YUKTI** प्रकल्प, आणि बौद्धिक संपदा साक्षरतेसाठीच्या **KAPILA** उपक्रमांतर्गत आपल्या कल्पनांची नोंदणी करून स्वतःचे पेटंट्स (IPR) सुरक्षित करावेत आणि त्यांचे व्यावसायिक मॉडेल उभे करावे.
- **कॅम्पस बिझनेस फेअर:** स्वतः तयार केलेल्या उत्पादनांची आणि सेवांची चाचणी घेण्यासाठी महाविद्यालयात नियमितपणे 'व्यापार मेळे' (Trade Fairs), ई-कॉम्पिटिशन्स आणि बिझनेस पिचिंग फेस्टचे आयोजन विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन करावे.
- **व्यावहारिक इंटर्नशिप:** वास्तविक कॉर्पोरेट जगताचे नियम समजून घेण्यासाठी विविध उद्योगांना भेटी देणे आणि प्रत्यक्ष 'इंटर्नशिप' (Internship) पूर्ण करून आपले व्यवहारचातुर्य वाढवणे विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे.

## **९. अपेक्षित दूरगामी परिणाम: राष्ट्रनिर्माण व तात्विक ध्येय (Expected Vision & Outcomes)**

या संपूर्ण योजनेचा आणि स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्षाचा अंतिम उद्देश केवळ काही कागदी कंपन्या किंवा आर्थिक नफा कमवणे हा नसून, त्यामागे एक महान **राष्ट्रनिर्माणाचा तात्विक विचार** आहे:

- **नोकरी देणाऱ्या महाशक्तींची निर्मिती:** महाविद्यालयाच्या भक्कम आर्थिक व तांत्रिक साहाय्यातून उद्याचे उद्योगपती निर्माण होतील. आमचा विद्यार्थी भविष्यात पदवी घेऊन बाहेर पडताना "मला नोकरी द्या" म्हणून कोणासमोरही हात पसरणार नाही, तर **'तो स्वतः शेकडो हातांना नोकरी देणारा'** एक खंबीर उद्योजक म्हणून समाजाचा कणा बनेल.

- **समाजासाठी जबाबदार नागरिक:** या प्रक्रियेतून तावूनसुलाखून निघालेला तरुण हा केवळ पैशांमागे धावणारा नसेल, तर तो नैतिक मूल्यांची जपणूक करणारा, कायदे पाळणारा आणि समाजाप्रती उत्तरदायित्व बाळगणारा एक सुजाण व जबाबदार नागरिक असेल.

- **विकसित भारताचे स्वप्न साकार:** जेव्हा देशातील तरुण स्वयंप्रकाशीत, सशक्त आणि आत्मनिर्भर बनेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने सशक्त, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताची निर्मिती होईल. युवकांच्या याच पवित्र पुरुषार्थातून राष्ट्रनिर्माण घडून येईल आणि सन २०४७ च्या 'विकसित भारताच्या' (Viksit Bharat) जडणघडणीत आणि देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादकतेच्या (GDP) वाढीमध्ये आपल्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे योगदान सुवर्णअक्षरांनी कोरले जाईल.